<u>जलस्वराज्य-२ कार्यक्रम-</u>

बाहयसहाय्यित पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी गठीत शक्ती प्रदान समितीच्या ५८व्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांस मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-१११७ / प्र. क्र. ३००/ पापु-११
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,७ मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ०१.
तारीख: ०६ मार्च, २०१८

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांक : ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. डब्ल्युबीपी-१०९४/सी.आर-८३१/४१ अ, दिनांक १५ जून, १९९४.
२) शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-२००४/प्र.क्र.३८३५/पापु-११, दिनांक ०७ जून, २००४.
३) शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-१२१३/ प्र.क्र. २००/पापु-११, दिनांक ०४ जानेवारी, २०१४.
४) शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-०११४/ प्र.क्र. २०/पापु-११, दिनांक १३ जून, २०१४.
५) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः जस्वप्र-०११४/ प्र.क्र. २०/पापु-११, दिनांक ०८ एप्रिल, २०१५.
६) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः जस्वप्र-०११४/ प्र.क्र. २०/पापु-११, दिनांक ०७ मे, २०१५.
७) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः जस्वप्र-१२१४/ प्र.क्र. २५६/पापु-११, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१६.
८) शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-१२१४/ प्र.क्र. २५६/पापु-११, दिनांक ०३ मार्च, २०१६.
९) शासन निर्णय क्रमांकः जस्वका-२/०११६/ प्र.क्र.०४/पापु-११, दिनांक १८ एप्रिल, २०१६.

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यात २०१४ ते २०२० या कालावधीमध्ये जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत बाहय अर्थसहाय्यित महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्प (जलस्वराज्य-२) या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या बाहय अर्थसहाय्यित पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता शासन कार्यनियमावली प्रमाणे ज्या विषयाबाबतचे निर्णय मंत्री मंडळाने घ्यावयाचे आहेत ते सोडून इतर सर्व विषयाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार तसेच विशेष तरतूदी करुन प्रकल्पाची अंमलबजावणी शीघ्र गतीने व्हावी याकरिता निर्णय घेण्याचे संदर्भाधीन क्रमांक १ व २ मध्ये नमूद शासन निर्णयानुसार गठीत शक्ती प्रदान समितीस प्रदान करण्यात आले आहेत.

शक्ती प्रदान समितीच्या दि. १५ जानेवारी, २०१६ रोजी झालेल्या ५७ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित शासन निर्णय दिनांक १८ एप्रिल, २०१६ अन्वये प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग यांना शक्ती प्रदान समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या शक्ती प्रदान समितीची ५८ वी बैठक दिनांक ०६ डिसेंबर, २०१७ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये जलस्वराज्य-२ कार्यक्रमाची अंमलबजावणीबाबत समितीने घेतलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने विषयनिहाय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

बाहय अर्थसहाय्यित पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी गठीत शक्ती प्रदान समितीच्या ५८ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील विषयाबाबत निर्णयास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) उप सचिव तथा प्रकल्प संचालक व प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य यांना निवासस्थानाच्या भाड्यापोटी भरण्यात येणाऱ्या खर्चाची अंशत: प्रतिपूर्ती करावयाची असल्यास याबाबत शक्ती प्रदान समितीची पूर्वमान्यता घेणेबाबत :-

बाहय अर्थसहाय्यित पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या शक्ती प्रदान समितीची ५७ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार संदर्भाधीन क्र. ८ मध्ये नमूद दिनांक ०३ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये उप सचिव तथा प्रकल्प संचालक व प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य यांना निवासस्थानाच्या भाड्यापोटी भरण्यात येणाऱ्या खर्चाची

अंशत: प्रतिपूर्ती करण्यास शासन मान्यता देण्यात आली होती. या निर्णयामध्ये शक्ती प्रदान समितीच्या ५८ व्या बैठकीत सुधारणा करण्यात आली असून यानुसार उप सचिव तथा प्रकल्प संचालक व प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य यांना निवासस्थानाच्या भाड्यापोटी भरण्यात येणाऱ्या खर्चाची अंशत: प्रतिपूर्ती करावयाची असल्यास याबाबत शक्ती प्रदान समितीची पूर्वमान्यता घेण्यात यावी.

ब) जलस्वराज्य-२ कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकरिता उप सचिव तथा प्रकल्प संचालक यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्याबाबत

सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागासाठी उप सचिव तथा प्रकल्प संचालक यांना नियंत्रक अधिकारी, अवर सचिव (पापु-११) यांना कार्यालय प्रमुख तसेच वित्त नियंत्रक यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

क) महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (MEETRA) यांस उत्कृष्टता विकास केंद्र विकसित करण्याकरिता अतिरिक्त रु. १५.०० कोटी (रुपये पंधरा कोटी मात्र) इतक्या मर्यादेत निधीची तरतूद करण्यास मान्यता देणेबाबत -

महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (MEETRA) यांस उत्कृष्टता विकास केंद्र विकसित करण्याकरिता रू. ३७.५० कोटी इतकी तरतूद उपलब्ध आहे. यामध्ये अतिरिक्त रु. १५.०० कोटी (रुपये पंधरा कोटी मात्र) इतक्या मर्यादेत निधीची तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यानुसार सदर उत्कृष्टता विकास केंद्र विकसित करण्याकरिता रु. ५२.५० कोटी इतकी तरतूद करण्यात येत आहे.

मीत्रा, नाशिक या संस्थेच्या विकास कामांची किंमत रू.५.०० कोटीपेक्षा जास्त असल्याने वित्त विभागाच्या दि. १७ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयासोबतच्या वित्तीय प्राधिकार नियमावली १९७८ मधील उप विभाग ५ मधील मुद्दा क्र. १ मधील अट क्र.११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नियोजन

विभागाच्या दि. ०८ जानेवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक राहील.

ड) जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकरिता भाडेतत्वावर एक अतिरिक्त वाहन उपलब्ध करुन घेण्याबाबत :-

जलस्वराज्य-२ या कार्यक्रमांतर्गत निमशहरी पाणी पुरवठा योजना, पाणी गुणवत्ता बाधित गावे वाड्या/वस्त्यांसाठी करावयाच्या उपाययोजना, दुर्गम किंवा पाणी टंचाई असलेल्या भागांकरिता उपाययोजना आणि अतिशोषित पाणलोट क्षेत्रामध्ये जलधर स्तर विकसित करणे या योजना अनुषांगिक योजना अंमलबजावणी स्तरावर असून याकरिता संनियंत्रणासाठी क्षेत्रभेटी, आढावा बैठकी यांचे आयोजन करण्यात येत आहे. याकरिता सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकरिता स्कॉर्पियो प्रवर्गातील एक अतिरिक्त वाहन भाडेतत्वावर घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

इ) जलस्वराज्य-२ कार्यक्रमाअंतर्गत माहिती, शिक्षण व संवाद (IEC) करिता रुपये १०.०० कोटी इतका वाढीव निधी मंजूर करण्याबाबत :-

जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत माहिती, शिक्षण व संवाद या उपक्रमाच्या अंमलबजावणीकरिता मुळ आराखडयामध्ये रू. १३.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी मान्यता दिल्यानुसार रु. १०.०० कोटीची वाढ करण्यात येवून एकूण रू. २३.०० कोटी इतकी माहिती, शिक्षण व संवाद या उपक्रमाच्या अंमलबजावणीकरिता तरतूद करण्यात आली.

बाहय अर्थसहाय्यित पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या शक्ती प्रदान समितीची ५८ व्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार जलस्वराज्य-२ कार्यक्रमाअंतर्गत माहिती, शिक्षण व संवाद (IEC) करिता वरील अतिरिक्त रुपये १०.०० कोटी इतकी वाढीव तरतूद करण्यास पुढील अटीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) माहिती, शिक्षण व संवाद (IEC) करिता प्राप्त अतिरिक्त निधी तसेच सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे या प्रयोजनाकरिता उपलब्ध असलेला उर्वरीत निधी यातून नळ पाणी पुरवठा योजनांची शाश्वतता, देखभाल दुरुस्ती, पाणीपट्टीची वसुली तसेच सांडपाणी व्यवस्थापन (Sullage Management) व जलधर निर्धारण (Aquifer Management) या बाबीसंदर्भात माहिती व शिक्षण संवाद (IEC) करण्यात यावी.

२) सदर निधी कार्यक्रम मार्गदर्शिकेत सुचविल्यानुसार आर्थिक वर्ष २०१७-१८ मधील उर्वरीत कालावधीकरिता म्हणजेच जानेवारी, २०१८ ते ३१ मार्च, २०१८ या कालावधीसाठी वार्षिक कृती आराखडा निश्चीत करावा.

३) आर्थिक वर्ष २०१८-१९ व आर्थिक वर्ष २०१९-२० या कालावधीकरिता आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वी वार्षिक कृती आराखडा तयार करुन त्यास आवश्यक मान्यता घेण्यात याव्या.

४) वार्षिक कृती आराखडयामध्ये आवश्यकता भासल्यास सुधारणा करण्याचे अधिकार उप सचिव तथा प्रकल्प संचालक यांना प्रदान करण्यात येत आहेत.

५) शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाद्वारे विविध विभागाच्या योजनांसाठी प्रसिध्दी तसेच जाहिरातविषयक कार्य पार पाडण्याकरिता जाहिरात धोरण निश्चित केले असून जाहिरात संस्थांची सूची दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. या शासन निर्णयानुसार निश्चित निवड सूचीतील जाहिरात संस्था (Panel of Advertising Agencies) यांची आवश्यकतेनुसार माध्यमनिहाय सेवा घेण्यात यावी.

६) याशिवाय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ मधील अटी व शर्तीचे अनुषांगिक बाबींकरिता पालन करणे, बंधनकारक राहील.

७) योजनेची माहिती देण्याकरिता ज्या माहिती, शिक्षण व संवाद (IEC) प्रणालीचा वापर करण्यात आला आहे, त्या अनुषंगाने निश्चित वस्तु मुद्रित साहित्य लाभार्थीपर्यंत व्यवस्थित पोचेल, याची संपुर्ण जबाबदारी उप सचिव तथा प्रकल्प संचालक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष यांची राहील.

८) माहिती, शिक्षण व संवाद (IEC) करिता ज्या जाहिरात संस्थेस कार्य पार पाडण्याची जबाबदारी दिली आहे, अशा संस्थेकडून सदर कार्य व्यवस्थितरित्या पार पाडले जात आहे, याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी उप सचिव तथा प्रकल्प संचालक यांची राहील.

ई) <u>जलस्वराज्य-२ हा कार्यक्रमांतर्गत स्वच्छ भारत मिशनकरिता पुरस्कार व इतर अनुषांगिक बाबींकरिता अनावर्ती स्वरूपात रू.२०.०० कोटी इतका निधी पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो) यांना मंजूर करणेबाबत :-</u>

जलस्वराज्य-२ हा कार्यक्रम २०२० पर्यंत राबविण्यात येत असल्याने स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या कार्यक्रमाकरिता वार्षिक रू.१०.०० कोटी इतका आवर्ती स्वरूपात निधी उपलब्ध करून देण्याऐवजी स्वच्छ भारत मिशनकरिता पुरस्कार व इतर अनुषांगिक बाबींकरिता अनावर्ती स्वरूपात रू.२०.०० कोटी इतका निधी पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो) यांना उपलब्ध करून देण्यास पुढील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर निधी वितरणासंदर्भात कार्यक्रम मार्गदर्शिकेत नमूद केल्यानुसार वार्षिक कृती आराखडा निश्चीत करुन त्यानुसार खर्च करण्यास सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून पूर्व मान्यता घेण्यात यावी.

२) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो) यांच्याकडून त्यांना यापुर्वी वितरित करण्यात आलेल्या निधीचे खर्चाच्या तपशिलासह उपयोगिता प्रमाणपत्र व अपेक्षित निधीचा बाबनिहाय सविस्तर प्रस्ताव सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षास सादर केल्यानंतरच आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

३) मान्य करण्यात आल्यानुसार इतर अनुषांगिक बाबींपैकी माहिती, शिक्षण व संवाद या प्रयोजनाकरिता निधी वितरणासाठी उपरोक्त मुद्दा क्र. इ मध्ये नमूद अटींचे पालन करणे बंधनकारक राहील.

II. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या बाबींवर होणारा खर्च भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई येथे उप सचिव तथा प्रकल्प संचालक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (आरएसपीएमयु), यांचे नावे उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी खाते क्रामंक ६१८४३५००१० मधील उपलब्ध निधीमधून भागविण्यात यावा.

III. सदरहू शासन निर्णय शक्ती प्रदान समितीस संदर्भाधीन क्रमांक १, २ व ९ येथील शासन निर्णयांन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार व शक्ती प्रदान समितीच्या दिनांक ०६ डिसेंबर, २०१७ रोजी संपन्न झालेल्या ५८ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०५१२३३२३२८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jayant Vasant Wani

Digitally signed by Jayant Vasant Wani
Date: 2018.03.06 15:49:27 +05'30'

(जयंत वाणी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव :-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्य मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.

६. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.

७. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.

८. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.

९. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. विभागीय आयुक्त (सर्व)

११. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.

१२. संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.

१३. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

१४. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.

१५. जिल्हाधिकारी (सर्व).

१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

१७. उप सचिव (सर्व)/ मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई.

१८. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो), बेलापूर, नवी मुंबई.

१८. मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व).

१९. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व).

२०. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद (सर्व).

२१. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व).

२२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व).

२३. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व).

२४. पा. पु. व स्व. विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.

२४. निवड नस्ती (कार्यासन पापु-११), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, बेलापूर, नवी मुंबई.

२५. निवड नस्ती (कार्यासन पापु-४, ५, ७, २०), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई.